हमीपत्र

मी, श्री./श्रीमती राघवेंद्र आंदराव सन्नके वय ः 43 राहणार विटा ता. खानापूर जि. सांगली असे प्रतिज्ञापूर्वक लिहुन देतो की, माझा पाल्य साईनाथ सन्नके नाते सुलभा वय ः 18 राहणार विटा ता. खानापूर जि. सांगली यांने आपल्या आदर्श इन्स्टिटयुट ऑफ टेक्नालॉजी & रिसर्च सेंटर विटा Diploma, ता. खानापूर, जि. सांगली या AIML Diploma अभ्यासक्रमास महाविद्यालयात CAP/ ACAP/ Institute Level (Management) मधे प्रवेश घेतला असुन मला महाविद्यालयाच्या खालील सर्व अटी विनाशर्त मान्य आहेत. माझा मोबाईल नं. 9423218066 हा असुन याचर आपण मला संपर्क साधू शकता.

माझ्या पाल्याचा प्रवेश CAP/ACAP/Institute Level (Management) कोटयातुन झाले असून मी माझा उत्पन्नाचा दाखला आपल्या माहितीस्तव सादर करीत आहोत. तसेच मला खाली नमुद केलेल्या दिनांका पर्यंत विविध टप्प्यांमध्ये शिष्यवृत्तीची रक्कम वजा करून राहीलेली फीची रक्कम भरणे मान्य आहे.

टप्पा	दिनांकापर्यंत	Category (फि ची टक्केवारी)		
		NT/VJ/SBC/EBC Girls	EBC/OBC	Open / Management
रक्कम	-	100% Development fee Only	50% Tuition Fee + 100% Development fee	100% Tuition fee + Development fee
पहिला				
दुसरा				

१. शासन निर्णया नुसार मी शिष्यवृत्तीचा अर्ज महाविदयालयाने दिलेल्या वेळेत सादर करेन जर अर्ज न भरल्यास महाविदयालयाची संपूर्ण शैक्षणिक फी भरणेस मी तयार आहे. तसेच दोन्ही सत्राचे परिक्षा अर्ज बोर्ड व विदयापीठाने दिलेल्या वेळापत्रकानुसार भरणेची जबाबदारी स्वता माझी असेल.

२. माझ्या पाल्याचा महाविद्यालयातील प्रवेश निश्चित करणेकरिता मी त्याची मुळ कागदपत्रे आपणांस सादर करीत आहोत. त्याचा प्रवेश झाल्यानंतर मला कुठल्याही कारणास्तव त्याचा प्रवेश रदद् करावयाचा नाही. जर माझेकडून किंवा माझ्या पाल्याकडून असे झालेस तर मी महाविद्यालयाच्या नुकसानीस जबाबदार असेन व सदर नुकसान भरपाई देणेस बांधील असेन.

३. जर मी किंवा माझ्या पाल्याने प्रवेश रदद् केला तर महाविद्यालयाचे नुकसान भरपाई दिलेनंतरच मला माझ्या पाल्याची मुळ कागदपत्रे मिळतील याची मला जाणीव आहे.

४. महाविदयालयाच्या नियमाप्रमाणे मी ड्रेसकोड आय कार्ड तसेच शुज या सर्व गोष्टींचे पालन करेन व महाविदयालयात कोणतेही बेशिस्त वर्तन करणार नाही असे वचन देतो. तसेच महाविदयाला सर्वील सिक्युरिटी गेट वरील सर्व नियमांचे मी पालन करेन अशी हमी देतो.

५. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विदयापीठ लोणेरे यांनी वालुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार माझ्या पाल्याची प्रवेश घेत असलेल्या महाविद्यालयात शैक्षणिक उपस्थिती ८०% असणे आवश्यक असते, याची मला पूर्णपणे माहिती आहे. माझ्या पाल्याची महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या Theory व Practical (Online/Offline) तासिकांमध्ये कोणत्याही कारणास्तव उपस्थिती ८०% पेक्षा कमी असणार नाही. माझ्या पाल्याकडून असे झाल्यास महाविद्यालयातर्फे

होणाऱ्या शैक्षणिक कारवाईस मी बांधील असेन व यासाठी मी इतर कोणालाही किंवा संस्था संबंधीत व्यक्तीशी संपर्क करून महाविद्यालयावर दबाव आणणार नाही.

६. माझ्या पाल्याची प्रत्येक महिन्याची उपस्थिती व शैक्षणिक प्रगती जाणून घेणेसाठी मी स्वतः महाविद्यालयास प्रत्येक महिन्यामध्ये किमान एकदा तरी भेट देईन किंवा मोबाईल फोनच्या माध्यमांतुन संपर्क साधून माझ्या पाल्याची उपस्थिती व प्रगती जाणून घेण्यास मी बांधील असेन.

७. आपणांस महाविद्यालयाकडून सादर करण्यात येणाऱ्या प्रगती पुस्तकामध्ये जर पालकांची स्वाक्षरी स्वतः विद्यार्थ्याने केली तर त्याला मी व माझा पाल्य स्वतः जबाबदार असतील.

८. मी, माझा पाल्य व माझे इतर कुणीही नातेवाईक महाविद्यालयाच्या प्रशासकिय विभागास शासकिय, राजकिय व तत्सम प्रकारचा कुठलाही दबाव आणणार नाही याचे मी वचन देतो.

९. जर माझा पाल्य कॉलेज वसने येत असेल तर त्याचेकडून कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही असे झाल्यास व त्यामुळे काही अप्रिय घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मी, माझे कुटुंब व माझ्या पाल्याची असेल. तसेच बस पास फी महाविदयालयाने दिलेल्या नियमांप्रमाणे म्हणजेच प्रवेश घेते वेळी ५० टक्के व द्वितीय सत्र सुरू होते वेळी ५० टक्के फी भरणेची आहे. तसेच महाविदयालयाने बस साठी दिलेल्या बस थांब्या वरती मला दिलेल्या वेळेपुर्वी ५ मिनीटे आधी उपस्थित राहीन याची दक्षता घेइन.

१०. महाविद्यालयाव्दारे व्हॉटस्ॲपच्या माध्यमातील संदेश, टेलिफोनवरील संदेश किंवा पत्राव्दारे प्राप्त सुचनांचे पालन करण्यास मी व माझा पाल्य बांधील असेल याविषयी माझी तक्रार असणार नाही.

११. माझ्या पाल्याने महाविद्यालयाच्या वसतीगृहामध्ये प्रवेश घेतलेनंतर वसतीगृहाची तसेच खानावळीची फीची रक्कम वेळेवर भरने मला बंधनकारक असेल तसेच वसतीगृहाची नियमावली माझ्या पाल्यास व मला विनाशर्त मान्य असेल.

१२. महाविद्यालयातील परीसराचा माझा पाल्य संपूर्णपाणे काळजी घेईल, त्याची नासधूस होणार नाही व माझ्या पाल्याचे वर्तन परीसरात सुयोग्य व शोभनिय असेल याची मी ग्वाही देतो.

१३. महाविद्यालयात असणाऱ्या सर्व वस्तुंचा माझा पाल्य जबाबदारीने उपयोग करेल व त्याच्याकडून कसल्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही याची मी हमी देतो.

१४. माझा पाल्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच आगुंतक यांचेशी सौजन्याने वागेल. त्याच्याकडून कसल्याही प्रकारचा त्रास इतरांना झाला तर महाविद्यालयाकडून होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी व माझा पाल्य बांधिल असेल.

१५. आदर्श वसतीगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांनी वसतीगृह फी एकुण २५000/- रूपये असून सदर फी एक रकमी अथवा प्रवेशाच्या वेळी १२५00/- व माहे ३१ डिसेंबर पुर्वी उर्वरित फी १२५00/- अशा दोन हप्त्यामध्ये भरणे बंधनकारक राहील.

वर नमूद केलेल्या व वेळोवेळी देणात येणाऱ्या सुचनांचे मी व माझ्या पाल्यांकडून पालन न झाल्याम महाविद्यालयाकडून करण्यात येणारी दंडात्मक / शैक्षणिक कारवाई मला मंजुर असेल. याबददल माझी व माझ्या पाल्याची कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार राहणार नाही.

विदयार्थ्याचे नांव : साईनाथ राघवेंद्र सन्नके ..... सही : .....

पालकाचे नांव : राघवेंद्र शांतप्पशा सन्नके ..... सही : R.A.S.

नाते : भुलगा